**JALYUKTA SHIVAR AT KANHERSAR INSPECTED BY COLLECTOR & CEO OF PUNE (08th June, 2015)**



कनेरसर (ता. खेड) : जलयुक्त शिवार कामांची माहिती घेताना जिल्हाधिकारी सौरभ राव (डावीकडून पाचवे) व इतर.

## कनेरसरच्या कामाचे जिल्हाधिकाऱ्यांकडून कौतुक

दावडी, ता. ७ : कनेरसर (ता. खेड) येथे कृषी विभाग व भारत फोर्ज कंपनीच्या वतीने जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सुरू असलेल्या कामांची जिल्हाधिकारी सौरभ राव यांनी पाहणी केली. या कामांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

कृषी विभाग व भारत फोर्ज कंपनीच्या सीएसआर विभागामार्फत कनेरसर येथे सिमेंट व माती नाला बांधातील गाळ काढणे, नाला खोलीकरण, छोटे पाटबंधारे विभागामार्फत पाझर तलावातील गाळ काढणे ही कामे करण्यात आली आहेत. या कामांची उपयुक्तता व झालेल्या कामांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी राव यांनी नुकतीच कनेरसर गावास भेट दिली.

या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कांतिलाल उमाप, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष काटकर, प्रांताधिकारी हिम्मतराव खराडे, तहसीलदार प्रशांत औटी, गटविकास अधिकारी अजिंक्य पवार, भारत फोर्जच्या असोसिएट व्हाइस प्रेसिडेंट लीना देशपांडे, तालुका कृषी अधिकारी लक्ष्मण होटकर, मंडल कृषी अधिकारी नामदेव भालेराव, प्रमिला मडके, मोहन दौंडकर, कैलास धुमटकर उपस्थित होते.

उपस्थितांच्या हस्ते खेड सिटी येथे पर्यावरणदिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण करण्यात आले. जिल्हाधिकारी राव यांनी सिमेंट नाल्यातील गाळ काढण्याच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून समाधान व्यक्त केले. गाळाचा उपयोग शेतकऱ्यांनी खडकाळ जमिनी पेरणीयोग्य करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

-----------------------------

# PRATHAM PUNE EDUCATION FOUNDATION



## वस्त्यांतील विद्यार्थ्यांतून प्रकटले 'बालवैज्ञानिक'

**पुणे :** पुणे शहरातील १२ विविध वस्त्यांमध्ये पालिका शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी भारत फोर्ज संचालित प्रथम पुणे एज्युकेशन फाऊंडेशन कार्यरत आहे. शिशुवाचन, शिबिरे, ग्रंथालय गणित इंग्रजी विज्ञान विषयांचे विशेष वर्ग आदी उपक्रम या अंतर्गत राबविले जातात. सुमारे दहा हजारांपेक्षा जास्त मुले या उपक्रमांचा लाभ घेत आहेत.

विज्ञानदिनाचे औचित्य साधून प्रथम पुणे एज्युकेशन फाऊंडेशनने वस्तीपातळीवरील मुलांसाठी बाळमेळावा घेतला. या कार्यक्रमादरम्यान मुलांमार्फत बनविण्यात आलेले विविध विज्ञान प्रयोग व प्रदर्शन सादर करण्यात आले होते. ५५० मुले यात सहभागी झाली होती.

फाऊंडेशनच्या विश्वस्त सौ. सुनीता कल्याणी यावेळी उपस्थित होत्या. कार्यक्रमासाठी प्रथम पुणे एज्युकेशन फाऊंडेशनचे अविनाश पेंडसे, शिक्षक वर्ग तर भारत फोर्ज कंपनीमार्फत लिना देशपांडे उपस्थित होते.

**Vishwadarpan Newspaper- 21.03.2015**

## भारत फोर्ज संचलित प्रथम पुणे एज्युकेशन फाऊंडेशनचा बालमेळावा उत्साहात साजरा

पुणे - पुणे शहरातील १२ विविध वस्ती पातळीवरील म. न. पा. शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी प्रथम पुणे एज्युकेशन फाऊंडेशन विविध उपक्रम व प्रकल्पांतर्गत कार्यरत आहे. शिशुवाचन वर्ग, लर्निंग कॅम्प्स, लायब्ररी वर्ग, गणित, इंग्रजी, विज्ञान विषयांचे विशेष वर्ग आदी या अंतर्गत राबविले जातात.

सुमारे दहा हजारपेक्षा जास्त मुले या उपक्रमांचा लाभ घेत आहेत. शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०१५ रोजी विज्ञानदिनाचे औचित्य साधून भारत फोर्ज संचलित प्रथम पुणे एज्युकेशन फाऊंडेशन यांनी वस्तीपातळीवरील मुलांसाठी बाळमेळावा साजरा करण्यात आला. या कार्यक्रमादरम्यान मुलांमार्फत बनविण्यात आलेले विविध विज्ञान प्रयोग व प्रदर्शन सादर करण्यात आले होते. अंदाजे ५५० मुले ह्यात सहभागी झाले होते. प्रथम पुणे एज्युकेशन फाऊंडेशनच्या विश्वस्त 'सौ. सुनिता कल्याणी' यावेळी उपस्थित होत्या. हे प्रदर्शित केलेले प्रयोग अतिशय उत्सुकतेने पाहून सौ. सुनिता कल्याणी यांनी मुलांचे कौतुक केले.

सदर कार्यक्रमासाठी प्रथम पुणे एज्युकेशन फाऊंडेशनचे अविनाश पेंडसे, शिक्षक वर्ग, तर भारत फोर्ज कंपनीमार्फत लिना देशपांडे, सी. एस. आर. प्रतिनिधी उपस्थित होते व प्रशिक्षणार्थी यांनी स्वयंसेवक म्हणून सहकार्य केले.

**PUNE SATTA - 24.03.2015**

## भारत फोर्ज संचलित प्रथम पुणे एज्युकेशन फांडेशनचा बालमेळावा उत्साहात साजरा



**पुणे :** पुणे शहरातील १२ विविध वस्ती पातळीवरील म.न.प. शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी प्रथम पुणे एज्युकेशन फांउडेशन विविध उपक्रम व प्रकल्पंतर्गत कार्यरत आहे. शिशुवाचन वर्ग,लर्निंग कॅम्प्स, लायब्ररी वर्ग, गणित, इंग्रजी, विज्ञान विषयांचे विशेष वर्ग आदी या अंतर्गत राबविले जातात. सुमारे दहा हजारपेक्षा जास्त मुले या उपक्रमांचा लाभ घेत आहेत.

शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०१५ रोजी विज्ञानदिनाचे औचित्य साधून भारत फोर्ज संचलित प्रथम पुणे एज्युकेशन फांडेशन यांनी वस्तीपात्ळीवरील मुलांसाठी बाळमेळावा साजरा करण्यात आला. या कार्यक्रमा दरम्यान मुलांमार्फत बनविण्यात आलेले विविध विज्ञान प्रयोग व प्रदर्शन सादर करण्यात आले होते.अंदाजे ५५० मुले (ह्यात सहभागी झाले होते.

प्रथम पुणे एज्युकेशन फांडेशनच्या विश्वस्त 'सौ. सुनित कल्याणी' यावेळी उपस्थित होत्या. हे प्रदशित केलेले प्रयोग अतिशय उत्सुकतेने पाहून सौ. सुनिता कल्याणी यांनी मुलांचे कौतुक केले.

सदर कार्यक्रमासाठी प्रथम पुणे एज्युकेशन फांडेशनचे अविनाश पेंडसे, शिक्षक वर्ग, तर भारत फोर्ज कंपनीमार्फत लिना देशपांडे, सी. एस. आर. प्रतिनिधी उपस्थित होते व (GETs) प्रशिक्षणार्थी यांनी स्वयंसेवक म्हणून सहकार्य केले.

**Tarankit - 24.03.2015**

**Tarankit - 24.03.2015**